प्रकरण दुसरे

# सदानंद देशमुख यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व

# प्रकरण दुसरे

# सदानंद देशमुख यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व

### ❖ प्रास्ताविक: -

'बारोमास' कादंबरीचा अभ्यास करताना पहिल्या प्रकरणात कादंबरी वाङ्मयाचा इतिहास आणि तिच्या विकासाचा परामर्श घेतला. प्रस्तुत प्रकरणात सदानंद देशमुख यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून घेणे अगत्याचे आहे. मराठी ग्रामीण साहित्यातील एक महत्त्वपूर्ण आधुनिक ग्रामीण लेखक म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. त्यांनी कथा, कविता, कादंबरी, ललितलेखन या साहित्य प्रकारात लेखन करून ग्रामीण साहित्याला नवी उभारी दिली. गेल्या दोन - तीन दशकांपासून त्यांचे लेखन सुरू आहे. त्यांची आजपर्यंत एकूण ९ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या पुस्तकांची संख्या मोजकीच असली तरी गुणात्मकदृष्टया या पुस्तकांनी एक उच्चांक गाठला आहे. अशा वैविध्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या सदानंद देशमुख यांच्या व्यक्तिचरित्राचा प्रथमत: परिचय करून घेऊ.

### ❖ व्यक्तिचरित्र: -

**नाव:** - प्रा. सदानंद नामदेवराव देशमुख.

**जन्म:** - ३० जुलै, १९५९ (अमडापूर)

**मूळगाव:** - अमडापूर, ता. चिखली, जि. बुलढाणा.

**पत्ता:** - शिवाजीनगर, जानेफळ, ता. मेहेकर, जि. बुलढाणा.

**शिक्षण:** - एम्. ए. बी. एड्. ,(पी एच्. डी. संशोधन सुरू आहे.)

**व्यवसाय:** - प्राध्यापक म्हणून सेवारत. (जानेफळ)

**साहित्यलेखन:** - कथा, काव्य, कादंबरी, ललितलेखन.

**प्रकाशित पुस्तकसंख्या:** - ९

विदर्भाच्या एका कोपऱ्यातून उदयास आलेले प्रा. सदानंद देशमुख हे आजच्या ग्रामीण साहित्यातील एक सकस ग्रामीण लेखक म्हणून नावारूपास आलेले व्यक्तिमत्त्व आहे. प्रा. सदानंद देशमुख यांचे मूळ गाव 'चिखली' तालुक्यातील 'अमडापूर' हे आहे. त्यांचा जन्म ३० जुलै १९५९ रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या जीवनात प्राथमिक शिक्षणापासूनच अनेक अडथळे निर्माण झाले होते.

वडिलांच्या शिस्तीमुळे शाळेत चोरूनच जावे लागत असे. 'कुठं शिकून बॅरिस्टर होणार हाये बे ! चाल, व्हय वावरात.' असा वडिलांचा धाक असे. आई पार्वतीला मात्र शिक्षणाविषयी गोडी वाटत असे. त्यांची आई त्यांना पोथी - पुराणातील गोष्टी, राजा - राणीच्या कथा, देवादिकांच्या कथा, भूताखेताच्या लोककथा सांगत असे. प्रा. सदानंद देशमुख यांच्या घरात कुठलेच असे वाङ्मयीन वातावरण नव्हते. रात्रंदिवस ढोरमेहनत करूनही सतत कडकी भोगणारे असे त्यांचे कुटुंब होते. शाळेत असतानाच त्यांना वाचनाचे खूप वेड होते. लहानपणापासून अविरतपणे शेतात राबावे लागे. त्यामुळे शेतात काम करणाऱ्या माणसांकडून, स्त्रियांकडून भरपूर कथा ऐकावयास मिळाल्या. या अद्‌भूतविश्वाला मनापुढे साकार करण्याची कल्पकता निर्माण झाली. या कल्पकतेची वेल त्या संस्कारक्षम वयात हळूहळू वाढली. याशिवाय आईने सांगितलेल्या कथा मनात चांगल्याच रूजल्या गेल्या. शारीरिक जडणघडणीत जशी अनुवांशिकता येते तशीच ती मनाच्या जडणघडणीवरही आली.

वाचनाचे जबरदस्त वेड असल्याने त्यानी शालेय जीवनात अनेक ग्रामीण लेखकांच्या कादंबऱ्या वाचल्या आणि त्यांचा सखोल असा अभ्यासही केला. आठवी ते दहावीपर्यंतच्या मधल्या काळात बनगरवाडी, महानंदा, चक्र, कोसला, पाचोळा, गोतावळा या आणि अशाच कितीतरी कादंबऱ्यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. त्या कादंबऱ्यातील कथानके, पात्रे त्यांच्या मनात फेर धरू लागली होती. ते याच विश्वात स्वत:ला हरवून जायचे स्वत:भोवती, शेती - शिवारात त्यांना कथेतील पात्रे दिसू लागली. मनात कथा निर्माण होऊ लागल्या त्या भोवतालच्या वास्तवाचा आधार घेऊनच. अशा वातावरणातूनच त्यांची 'देवाघरचं मरण' ही पहिली कथा 'महाराष्ट्र टाईम्स' च्या रविवारच्या साहित्यपुरवणीत छापून आली आणि एका नव्या ग्रामीण लेखकाचा उदय येथे दिसू लागला होता.

त्यांच्या मनात लिहिण्याची खूप इच्छा असतानाही वेळेअभावी शक्य होत नसे. दिवसभर वखर - नांगर हाकताना, औत - फाटयामागे फिरताना कथा - कविता मनात फेर धरायच्या मनात सतत याविषयी मंथन सुरू असे खडतर आयुष्य जगताना केवळ पुस्तकेच मनाला आनंद देत याची अनुभूती त्यांना आली होती. दहावीनंतरच्या काही काळातच लागोपाठ आई - वडिलांचे कृपाछत्र हरवले आणि सर्व भाऊ उघडे पडले, मिळेल त्या दिशेने सर्वजण जगण्यासाठी प्रयत्न करीत होते. शेती आणि पुस्तक वाचन या दोन गोष्टींना मात्र दूर ठेवले नाही. पुढे कुटुंब सावरल्यानंतर दोन वर्षांनी कॉलेजला प्रवेश घेतला कारण शिक्षणाचा ध्यास त्यांच्या मनाला लागलेला होता. शिवाय त्यांच्या आईनं लहानपणी असं सांगितल होतं, "शेत पडीत पडलं तर पुन्हा

वहिती करता येते. शिक्षण पडीत पडलं तर ते वहिती करता येत नाही."[१] आईची ही दोन वाक्ये मनात खोलवर रूजली होती. दरम्यानच्या काळात खूप काही अनुभवायाला मिळाले होते. वाचन आणि लेखन हा एकच ध्यास लागलेला होता. त्यांनी शिक्षणाबरोबर अवतीभोवतीचे वास्तवजीवन, व्यक्तिरेखा त्यांच्या समस्या कागदावर मांडण्याचा प्रयत्न केला हे तितकेच खरे आहे. तरूण भारत, लोकमत, लोकशिक्षण किर्लोस्कर इत्यादींतून कथा प्रसिध्द होत होत्या. त्यांचा पहिला कथा संग्रह बी. ए. होण्याअगोदरच 'अंधारबन' या नावाने प्रकाशित झाला. पण या कथासंग्रहाला विशेष अशी प्रसिध्दी मिळाली नाही.

प्रा. सदानंद देशमुख यांचे लिखानाचे वेड मात्र अजिबात कमी झाले नव्हते. 'महाराष्ट्र टाईम्स' मधून त्यांची एक कथा छापली गेली होती. त्या कथेला फारच सुंदर कथाचित्र काढले होते. हे चित्र पाहून त्यांचे मन आणखी भारावून गेले आणि लेखनासाठी चित्रही प्रेरणा देऊ शकतात याचा त्यांना प्रत्यय आला. एक लेखक म्हणून मराठी साहित्यक्षेत्रात आपण स्थिर होऊ शकतो असा आत्मविश्वास त्यांच्या मनात निर्माण झाल्यावर विचार करण्याची एक नवदृष्टी प्राप्त झाली. त्यांनी लेखन करण्यासाठी व्रतसाधना केली आणि अस्तित्ववाद व वास्तववाद त्यांचा स्वीकार केला आणि लेखनास प्रारंभ केला. प्रतिकूल परिस्थिती असूनसुध्दा मराठी विषयात एम्. ए. प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाले. नंतर पुढे बी. एड्. करून नोकरी मिळवली. नोकरी लागल्यावर परिस्थिती फारसी बदलली नव्हती. नोकरी करत असलेलं गाव हे धड शहरही नव्हतं आणि धड खेडेही नव्हतं. याशिवाय कौटुंबिक जबाबदारी सांभाळताना त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले होते. खूप यातना सोसाव्या लागल्या तरी ते खचून न जाता मोठया उमेदीने उभे राहिले.

सदानंद देशमुख यांनी आपला स्वत:चा असा एक मोठा मित्रपरिवार निर्माण केला होता. रा. रं. बोराडे, विठ्ठल वाघ, सुमती लांडे, राजन गवस, नारायण कुलकर्णी, कवठेकर या सर्वांशी त्यांचे सलोख्याचे असे संबंध आहेत. विदर्भाच्या एका कोपऱ्यात बसलेल्या 'जानेफळ' येथे प्राध्यापक म्हणून काम करणारे सदानंद देशमुख हे व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव यांच्यानंतरचे एक नवआधुनिक सकस ग्रामीण लेखक म्हणून मान्यता पावले आहेत.

ग्रामीण जीवनाचे आशयसंपन्न, भेदक व जिवंत चित्रण त्यांनी आपल्या कथा - कादंबऱ्यातून चित्रित केले आहे. 'लचांड' या कथासंग्रहातील एक - एक कथेतून वास्तव जीवनात त्यांनी पाहिलेल्या व्यथा - वेदनांची लक्तरेच मांडली आहेत. ग्रामीण भावविश्वातील लोभ, राग, व्यथा, वेदना, हुंकार, उद्ध्वस्तपण व्यक्त करताना

एरवी साहित्यात दिसणारा आक्रस्ताळेपणा किंवा भडकपणा त्यांच्या लेखनात मात्र कुठेही दिसून येत नाही. ग्रामीण जीवन हेच त्यांच्या लेखनाचे प्रेरणास्त्रोत असल्यामुळे या प्रेरणांशी प्रतारणा करण्याचा विचार त्यांच्या मनाला कधीही शिवला नाही हेच खरे. त्यांनी जिवंत अनुभव अगदी सच्चेपणाने मांडून ग्रामीण जीवनाचा बारकाव्यानिशी अभ्यास करून यथार्थ ग्रामीण जीवन दर्शन घडविले आहे. यावरूनच त्यांच्या प्रतिभाशक्तीची कल्पना आपणास सहजपणे येते.

प्रा. सदानंद देशमुख यांनी आपल्या लेखनात प्रारंभापासून आजपर्यंत जीवनाच्या वास्तवाचा व्यापक मूलाधार, त्यातील दु:ख, हुंकार, हालाखी, विरोधाभास यांचा शोध घेतला आहे. 'महालूट' या कथासंग्रहात कातकरी शेतकऱ्यांच्या जीवनातील असंख्य प्रश्न मांडले आहेत. ग्रामीण शेतकरी जीवनाचे अस्तित्व जीवनसंघर्षाची मानवी करूणेची अभंगगाथा त्यांच्या लेखनातून रेखीवपणे प्रकट झाली आहे. 'उठावण' या कथासंग्रहात 'बंड' करून उठलेल्या शेतकऱ्याचे चित्रण आलेले आहे तर 'रगडा' या कथासंग्रहात ग्रामीण स्त्रीस्वभावाचे असंख्य पदर अगदी अलगदपणे उलगडून दाखविले आहेत. त्याचबरोबर कणखर स्त्री स्वभावाचे दर्शनही तितक्याच प्रभावीपणे घडविले आहे.

'तहान' या कादंबरीतून ग्रामीण भागातील 'पाणीटंचाई'या ज्वलंत अशा सामाजिक प्रश्नावर भाष्य केले आहे. 'तहान' संदर्भात डॉ. र. बा. मंचरकर म्हणतात, "१९८० - १९९० या दशकात मराठी ग्रामीण साहित्यातून खेडे हद्दपार झाले आहे, असे मी लिहिले होते. १९९० - २००० या काळात ते पुन्हा गवसताना विश्वास पाटलांच्या कादंबरीत दिसते. हीच पुढच्या कादंबरीची दिशा आहे, असेही मी म्हटले होते. त्या दिशेने जाणारी चांगली ग्रामीण कादंबरी म्हणून 'तहान' मला फार आवडली. ग्रामीण जीवन, निसर्ग, विविध सामाजिक घटक यांची सखोल जाण आपल्याजवळ आहे. आशयसूत्रांची वीण, त्यांना संघटित करणारी रूपदृष्टी आणि त्याला आकार देणारी अस्सल भाषा तीत आहे. व्यक्तिगत जाणिवांची तीक्ष्णता आणि सामूहिक जाणिवांची घनता यांचा कलात्मक मेळ 'तहान' मध्ये नेमका साधला आहे."[२] मंचरकरांचे हे मत अगदी सार्थ आहे. तर 'बारोमास' या कादंबरीतून शेतकऱ्याच्या जीवनाची शोकांतिका मांडली आहे.

प्रा. सदानंद देशमुख यांचे लेखन कसदार आणि काळजाचा ठाव घेणारे असेच आहे. त्यांचे प्रत्येक पुस्तक मनाला अस्वस्थ करून जाते. शेतीची मशागत ज्या तन्मयतेने शेतकरी करीत असतो तेवढयाच तन्मयतेने सदानंद देशमुख यांनी ग्रामीण साहित्याची मशागत केली आहे आणि आजवर करीतही आहेत.

कथा - कादंबऱ्यांबरोबर त्यांनी काव्यलेखनही केले आहे. 'गावकळा' या काव्यसंग्रहातून ग्रामीण मातीचा गंध दरवळत ठेवला आहे. यावरूनच लेखकाला ग्रामीण जीवनाविषयी किती तळमळ आहे याची कल्पना येते.

अखंड आणि अविरत साहित्यलेखन साधनेने त्यांच्या साहित्य कलाकृती आता आकाशाचे चुंबन घेऊ लागल्या आहेत. सन ९० नंतर कथा, कवितांच्या ग्रामीण ललितलेखबंधाच्या पलिकडे जाऊन त्यांनी कादंबरीच्या माध्यमातून लेखनकक्षा विस्तारल्या एवढे मात्र खरे. आपले अंत:करण शब्दशिल्पात ओतून ग्रामीण जीवनाच्या यथार्थतेचा साज आणि बाज चढविला. १९६० नंतरच्या पिढीतील नव्या दमाचे कादंबरीकार म्हणून प्रा. सदानंद देशमुख यांचा नावलौकिक आहे.

जानेफळ येथे 'लोकसत्ता' या वृत्तपत्राचे वार्ताहर म्हणून त्यांनी प्रदीर्घ काळ काम केले आहे. लोकसत्ताने प्रा. सदानंद देशमुख यांचा 'नवग्रामीण साहित्याचा जीवनयात्री' म्हणून गौरव केला आहे. ग्रामीण साहित्यातील एक आश्वासक असे नाव म्हणून या ग्रामीण लेखकाचा उल्लेख केला जातो. प्रा. देशमुखांनी ग्रामीण जीवनातील समस्या, ग्रामीण माणसांच्या व्यथा - वेदना, कथा - कादंबऱ्यातून चित्रित केल्या आहेत. त्यांचे लेखन मुंबई, पुणे, खानदेश, मराठवाडा व विदर्भाची प्रमुख वृत्तपत्रे, वाङ्मयीन मासिके, दिवाळी अंक यामधून प्रसिध्द होत असे. वैदर्भी आणि वऱ्हाडी ग्रामीण जीवन यांचे वास्तव प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात दिसते. त्यांनी अखंडपणे केलेल्या खडतर साहित्यसाधनेचे फलित म्हणजे त्यांना प्राप्त झालेले अनेक पुरस्कार होत.

धगधगते ग्रामीण जीवन वाचकांसमोर उभे करणाऱ्या 'बारोमास' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार २००४ मध्ये मिळाला.

"साहित्य अकादेमी पुरस्कृत कृति 'बारोमास' उपन्यास है जो यथार्थपूर्ण ढंगसे ग्रामीण जीवन एवं संस्कृती का एक व्यापक चित्र प्रस्तुत करता है | देशमुखने ऐसा उच्च सौंदर्यपरख मानक को बनाए रखते हुए संभव किया है | अपनी मिर्मिती में यह उपन्यास प्रादेशिकता से उपर उठकर समूचे भारतीय ग्रामीण संस्कृती को रूपायित करता है | निश्चय ही यह कृति मराठी में लिखित भारतीय उपन्यास को एक महत्त्वपूर्ण योगदान है |"[३]

असा गौरव साहित्य अकादमीने केला आहे. हा बहुमान प्राप्त झाल्यावर प्रा. सदानंद देशमुख यांनी आपल्या भावना पुढील शब्दात व्यक्त केल्या आहेत, "शेतकरी कुटुंबात जन्मलो, काळया मातीत राबलो म्हणूनच मातीतल्या माणसांची

सुखदु:खे मांडू शकलो. या काळया मातीने मला लेखक बनविले व गौरविले. शेतकऱ्याच्या जीवनाला 'बारोमास' वेढून असणाऱ्या जन्मजात वेदनेच्या हुंकारातून जन्माला आलेल्या या कादंबरीचे प्रेरणास्थान माझ्या सभोवतीचा ओलासुका ग्रामीण परिसर हाच आहे. लेखकाने आपल्या निष्ठा आणि अनुभव यांच्याशी प्रामाणिक राहून लेखन करावे या माझ्यावरील वाङ्मयीन संस्काराचे फलित म्हणजे 'बारोमास' ही कादंबरी आहे."[४]

थोडक्यात असे म्हणता येईल की, प्रा. सदानंद देशमुखांनी खेडयातील ग्रामजीवन, शेती - शिवार आणि शेतकऱ्यांना सतत भेडसावणारे अनंत प्रश्न, संकटे याशिवाय जागतिकीकरणामुळे होणाऱ्या परवडीचे भेदक चित्रण त्यांच्या साहित्यातून चित्रित केले आहे. याशिवाय आपल्या वैदर्भीय बोलीला अधिक महत्त्व देऊन नव्या ढंगात साहित्यनिर्मिती केली आहे.

### ❖ प्रा. सदानंद देशमुख यांची साहित्य संपदा: -

प्रा. सदानंद देशमुख यांची साहित्य संपदा संख्येने कमी असून गुणात्मकदृष्टया मात्र अभिजात स्वरूपाची आहे. आजवर प्रा. सदानंद देशमुख यांचे पाच कथासंग्रह, दोन कादंबऱ्या, एक काव्यसंग्रह आणि एक ललितलेख संग्रह इत्यादी साहित्य प्रकाशित झाले आहे. या मोजक्याच साहित्य कलाकृतींनी ग्रामीण साहित्यात मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण जीवन हे केंद्रबिंदू मानून साहित्यनिर्मिती केली आहे.

विद्यार्थीदशेतच असताना त्यांचा पहिला कथासंग्रह 'अंधारवन' हा प्रकाशित झाला. या कथासंग्रहाने एका ग्रामीण लेखकाची ओळख मात्र वाचकांना झाली. त्यांचे एकूण पाच ग्रामीण कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत.

### ❖ साहित्यसंपदा: -

| अ. क्र. | कथासंग्रह | लेखक | प्रकाशक | प्रथमावृत्ती |
|---|---|---|---|---|
| १ | लचांड | प्रा. सदानंद देशमुख | मेहता पब्लिशिंग हाऊस, १२९६, सदाशिव पेठ, पुणे, ४११०३०. | १९९३ |
| २ | उठावण | प्रा. सदानंद देशमुख | मेहता पब्लिशिंग हाऊस, १२९६, सदाशिव पेठ, पुणे, ४११०३०. | १९९४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | महालूट | प्रा. सदानंद देशमुख | मेहता पब्लिशिंग हाऊस, १२९६, सदाशिव पेठ, पुणे, ४११०३०. | १९९६ |
| ४ | रगडा | प्रा. सदानंद देशमुख | मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. | एप्रिल २००६ |
| ५ | खुंदळघास | प्रा. सदानंद देशमुख | पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, ४०००२६. | २००८ |

| अ. क्र. | कादंबरी | लेखक | प्रकाशक | प्रथमावृत्ती |
|---|---|---|---|---|
| १ | तहान | प्रा. सदानंद देशमुख | कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. | १९९८ |
| २ | बारोमास | प्रा. सदानंद देशमुख | कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. | २००२ |

| अ. क्र. | काव्य | लेखक | प्रकाशक | प्रथमांवृत्ती |
|---|---|---|---|---|
| १ | गावकळा | प्रा. सदानंद देशमुख | सुविद्या प्रकाशन, पुणे. | २००५ |

| अ. क्र. | ललितलेख | लेखक | प्रकाशक | प्रथमावृत्ती |
|---|---|---|---|---|
| १ | मेळवण | प्रा. सदानंद देशमुख | मेनका प्रकाशन, पुणे. | २००८ |

हे त्यांचे लेखन प्रसिध्द झाले आहे.

ग्रामीण जीवनसंस्कृतीचे कवच भेदून वेध घेणारे ग्रामीण लेखक प्रा. सदानंद देशमुख यांचा लोकसत्ता या नियतकालिकाने गौरव केला आहे. “सदानंद

देशमुखांच्या वाङ्मय प्रतिमा व प्रतिभा व अभिव्यक्तीची ओळख आता राष्ट्रीय पातळीवरील साहित्याच्या दालनात बावनकशी शिरपेच म्हणून चकाकत आहे. आधुनिक मराठी साहित्यातील वलयांकित व पैलूदार हिरा म्हणून सदानंदला संबोधने अतिशयोक्ती होणार नाही."[५] हा त्यांचा केलेला गौरव अगदी सार्थ आहे असे म्हणायला हरकत नाही.

'लचांड' या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत प्रा. वासुदेव मुलाटे लिहितात, "आजचे ग्रामीण साहित्य हे नव्या संवेदनशील, सृजनक्षम मनाचा आविष्कार आहे. हा आविष्कार घडविणारे नव्या दमाचे साहित्यिक समाजाच्या सर्व स्तरातून, वर्गवर्णातून आणि जाती - जमातीमधून आलेले आहेत. ग्रामीण साहित्याच्या या निर्मितीकारांना साहित्यनिर्मितीची कोणतीही परंपरा नाही तरीही ते मोठया उमेदीने आणि आत्मविश्वासाने लिहित आहेत."[६]

प्रा. सदानंद देशमुख यांच्या साहित्यसाधनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यांच्या साहित्याने मराठी ग्रामीण विश्वात मोलाची भर घालून ग्रामीण साहित्याला एका उंचीवर नेवून पोहचविले आहे असे म्हणावयास हवे.

गेली दोन - तीन दशके ग्रामीण साहित्यात महत्त्वाचे मानलेले ग्रामीण साहित्यिक प्रा. सदानंद देशमुख यांच्या अविरत ग्रामीण साहित्यनिर्मिती साधना तपश्चर्येचे फळ म्हणजे त्यांना प्राप्त झालेले आजवरचे अनेक पुरस्कार हे होत. खडतर जीवन प्रवास करतानाही ग्रामीण जीवन अतिशय सच्चेपणाने साकार केले. ज्या वैदर्भीय मातीत जन्मले त्या मातीला ते विसरले नाहीत याचेच फळ त्यांना मिळाले. आपल्या काळया आईवर आणि आपल्या माणसांवर निर्व्याज प्रेम करणाऱ्या सदानंद देशमुख यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना एकूण १८ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. सदानंद देशमुखांच्या लिखाणात एक नवी प्रेरणा, बळ देण्याची ताकद आहे. त्यांच्या कादंबऱ्यांनी मराठी ग्रामीण कादंबरीला एक उंची प्राप्त करून दिली आहे. 'बारोमास' ही कादंबरी राष्ट्रीय पातळीवर पोहचली असून ती हिंदीसह अन्य भाषात अनुवादित झाली आहे. याशिवाय चित्रपटनिर्मितीही सुरू आहे.

लोकसत्ता या वृत्तपत्राने 'बारोमास' ची योग्य अशी दखल घेतली आहे, "सदानंद देशमुख यांच्या बारोमास कादंबरीला मिळालेल्या साहित्य अकादमीचा पुरस्कार हा गेल्या अडीच दशकापासून खेडे, खेडयातील भावजीवन, मागासशेती आणि शेतकऱ्याना बारोमास भेडसावणाऱ्या संकटाचे तसेच, जागतिक आर्थिक घडामोडींमुळे त्यांच्या होणाऱ्या परवडीच्या अनेक पण संयत चित्रणाचाच गौरव होय"[७]

प्रा. सदानंद देशमुखांना मिळालेले पुरस्कार हे त्यांच्या लेखणीचे फळ आहे असे म्हणावे लागेल.

❖ पुरस्कार: -

| | |
|---|---|
| १) मॅजेस्टिक प्रकाशनाचा जयवंत दळवी स्मृती कादंबरी पुरस्कार. | तहान |
| २) विदर्भ साहित्यसंघाचा पु. य. देशपांडे स्मृती कादंबरी पुरस्कार. | तहान |
| ३) शिवार प्रतिष्ठानचा शेतकरी साहित्य पुरस्कार. | तहान |
| ४) शोभणे प्रतिष्ठानचा केशवराव शोभणे स्मृती कादंबरी पुरस्कार. | तहान |
| ५) यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार. | तहान |
| ६) महाराष्ट्र साहित्य परिषदेचा ग. ल. ठोकळ पुरस्कार. | तहान |
| ७) फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिकेशर्स पुरस्कार. | उठावण |
| ८) महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार. | महालूट |
| ९) हेमांगीचा वि. स. खांडेकर कथा पुरस्कार. | महालूट |
| १०) महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार. | बारोमास |
| ११) साहित्य अकादमी पुरस्कार २००४. | बारोमास |
| १२) पद्मश्री विखे पाटील पुरस्कार. | बारोमास |
| १३) म. सा. प. चा ह. ना. आपटे कादंबरी पुरस्कार. | बारोमास |
| १४) यशंतराव दाते स्मृती संस्थेचा सहकार व शिक्षण महर्षी बापूरावजी देशमुख पुरस्कार. | रगडा |
| १५) विदर्भ साहित्य संघाचा वा. कृ. चोरघडे कथा पुरस्कार. | खुंदळघास |
| १६) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील पुरस्कार. | खुंदळघास |
| १७) ना. घ. देशपांडे काव्य पुरस्कार. | गावकळा |
| १८) चांडक प्रतिष्ठानचा बुलढाणा जिल्हा गौरव पुरस्कार. | |

❖ **शैक्षणिक: -**

✡ विशेष ग्रंथकार - म्हणून पुणे विद्यापीठात एम. ए. च्या अभ्यासक्रमात समग्र वाङ्मयाचा समावेश.

✡ प्रकाशित साहित्यावर सदानंद देशमुखांच्या कादंबऱ्या - एक आकलन (प्रा. लक्ष्मीकांत येळवंडे) आणि तहान: स्वरूप व समीक्षा (संपादक - डॉ. कैलास सार्वेकर) हे दोन समीक्षा ग्रंथ प्रकाशित.

✡ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर एस. एन. डी. टी. विद्यापीठात बी. ए. च्या अभ्यासक्रमात तहान कादंबरीचा समावेश.

✡ संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ येथे एम. ए. च्या अभ्यासक्रमात बारोमास कादंबरीचा समावेश.

✡ कर्नाटक सरकारच्या पदवीपूर्व अभ्यास क्रमात वर्ग ११ च्या 'साहित्य कुसुम' पुस्तकात तहान कादंबरीतील एक प्रकरण.

✡ महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमात वर्ग ११ च्या 'युवक भारती' पुस्तकात बारोमास कादंबरीतील एक प्रकरण.

✡ प्रकाशित साहित्यावर पीएच. डी. व एम. फिल. साठी संशोधन कार्य.

❖ **इतर: -**

✡ बारोमास कादंबरीवर चित्रपटनिर्मिती.

✡ बारोमास कादंबरीचा हिंदी अनुवाद - डॉ. दामोधर खडसे.

✡ रगडा कथासंग्रहाचा कथासरिता या दूरदर्शन मालिकेत समावेश.

✡ तहान कादंबरीचे आकाशवाणी जळगाववरून क्रमश: वाचन.

✡ बारोमास कादंबरीचे आकाशवाणी नागपूरवरून क्रमश: वाचन.

प्रा. सदानंद देशमुख यांच्या अनेक कथा मासिके, नियतकालिकातून प्रसिध्द झाल्या आहेत. त्यांच्या कविता अंतर्नाद या दिवाळी अंकातून प्रसिध्द झाल्या आहेत. प्रा. सदानंद देशमुखांनी विशेषत: ग्रामीण संस्कृती, प्रादेशिकता, ग्रामीण माणसांच्या व्यथा - वेदनांचे चित्रण केले आहे. त्यांच्या कादंबऱ्यातून बंडखोरवृत्ती दिसून येते पण आक्रस्ताळेपणा मात्र कोठेही दिसत नाही. समाजातील विविधांगी प्रश्नांना अगदी सहजपणे हाताळले आहे. ग्रामीण माणसांची दु:खे त्यांच्या मनाची होणारी घुसमट अगदी छोटया - छोटया प्रसंगातून व्यक्त केलेली आहे.

'तहान' ही कादंबरी १९९८ च्या 'ललित लक्षवेधी' पुस्तकांच्या यादीत समाविष्ट झाली आहे. महाराष्ट्र साहित्यपरिषदेत 'दशकाचे कथाकार' या उपक्रमात प्रा. सदानंद देशमुख यांचा सन्मान केला आहे. ललित मासिकांच्या दशकातले साहित्यिक या उपक्रमात त्यांचा समावेश केला आहे. त्याचबरोबर विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रिय कार्यकारिणीत सदस्य म्हणून सध्या कार्यरत आहेत.

सामाजिक बांधिलकी म्हणून प्रा. सदानंद देशमुखांनी आपली लेखणी सतत प्रकाशमान ठेवली आहे. प्रा. सदानंद देशमुखांना विशेषत: ग्रामीण स्त्रीविषयी कळवळा वाटतो. म्हणूनच त्यांच्या कथा - कादंबऱ्यातून स्त्रीमनाची घुसमट, त्यांची मानसिकता, जिद्द यांचे दर्शन घडले आहे. स्त्री - भावना, तिचा संघर्ष अशा अनेक बाबी त्यांच्या साहित्यातून प्रतीत होतात. ग्रामीण जीवनातील वास्तव आणि आलेले अनुभव यांच्या वेदनेतूनच सदानंद देशमुखांनी अस्सल ग्रामीण साहित्यनिर्मिती केली आहे. त्यांचे लेखन, मन अस्वस्थ करून जाते. त्यांनी ग्रामीण जीवनातील अनेक समस्या साहित्यातून मांडल्या आहेत. शेतकऱ्यांची परवड, ग्रामीण स्त्रीव्यथा, श्रीमंताची मक्तेदारी याचे वास्तव दर्शन त्यांच्या कथा - कादंबऱ्यातून घडते आहे. आजही त्यांचे लेखन तितकेच धारदारपणे होत आहे. आपल्या साहित्यलेखनाची भाषा अस्सल वैदर्भीय ग्रामीण वापरली आहे. 'बारोमास' या कादंबरीने मराठी ग्रामीण कादंबरीचे एक पाऊल पुढे टाकले आहे असेच म्हणावे लागेल.

आपली लेखणी ग्रामीण साहित्याला समर्पित करून मराठी ग्रामीण साहित्यात मोलाचे योगदान देण्याचे कार्य देशमुख आपल्या साहित्यसेवेने करीत आहेत.

### ❖ ग्रामीण जीवनाशी जुळलेली नाळ: -

माणूस हा ज्या मातीत जन्मला जेथे वाढला तेथील वातावरणाचा, संस्कृतीचा परिणाम हा त्याच्या मनावर घडत असतो. माणूस हा शरीराने कोणत्याही ठिकाणी असला तरी तो आपल्या मातीला, आपल्या माणसांना विसरू शकत नाही. त्याचे मन या मातीतच गुंतलेले असते मातीविषयीची ओढ कधीच कमी होत नसते. त्याच्या मनाचे पाय या मातीतच रोवून बसलेले असतात.

प्रा. सदानंद देशमुख यांच्या बाबतीत असेच म्हणावे लागेल देशमुख हे लेखनासाठी अजूनही खेडयाशी आपले नाते जोडून आहेत. तिथल्या कृषिव्यवस्थेला, ग्रामीण जीवनाला, समाजाला, त्यांच्या पडझडीला समजून घेण्याचा प्रयत्न त्यांनी नेहमीच केलेला आहे. खेडयानं, शेतशिवारानं लेखनाची प्रेरणा त्यांना दिली. सभोवतालचा ओला - सुका ग्रामीण परिसर हेच साहित्याचे प्रेरणास्थान असल्याने

आपल्या ग्रामीण मातीशी असणारे नाते अधिकच परिपक्व केले आहे. "शेतकरी कुटुंबात जन्मलो, काळया मातीत राबलो म्हणूनच मातीतल्या माणसांची सुखदु:खे मांडू शकलो. या काळया मातीने मला लेखक बनविले"[८] या त्यांच्या एका वाक्यातून त्यांची ग्रामीण जीवनाशी आणि ग्रामीण माणसांशी असणाऱ्या नात्याची वीण किती घट्ट आहे याची वाचकांना प्रचिती आल्याशिवाय राहत नाही.

प्रा. सदानंद देशमुख हे अतिशय गरीब शेतकऱ्याच्या घरी जन्माला आले. त्यांचे कुटुंब सतत कडकी भोगणारे होते. आई - वडील अडाणी, घरची परिस्थिती हालाखीची असल्याने शिक्षणाविषयी अनास्था होती. त्यामुळे बाराही महिने सतत शेतात राबत राहणे एवढेच त्या कुटुंबाला माहीत होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी सामना करीत त्यांचे शिक्षण सुरू होते.

प्रा. सदानंद देशमुख यांना लहानपणापासूनच वाचनाचे फार मोठे वेड होते. त्यांचा जन्म 'अमडापूर' या खेडयात झाल्याने त्यांचे बालपण त्या खेडयातच गेले. लहानपणी गुरा - ढोरांच्या मागे फिरत असताना सभोवतालच्या परिसराचे निरीक्षण करण्यातच त्यांचे मन रमून जात असे. सभोवतालचा परिसर त्यांना अस्वस्थ करीत असे. आजूबाजूला ज्या घडामोडी घडतात यांचा बारकाव्यानिशी ते अभ्यास करू लागले होते. वाचनाची आवड असल्याने गो. नी. दांडेकर, माडखोलकर, फडके, खांडेकर या लेखकाचे साहित्य बालपणीच वाचून काढले होते. गुरा - ढोरांच्या मागे जायला लागल्यावर वडिलांना चुकवून पुस्तक घेऊन जायचे आणि शेतात वाचन करायचे. उन्हाळयाच्या सुट्टीमध्ये एकपारणी काम करून दुपारी पुस्तक वाचन करायचे. पुस्तक वाचताना वडिलांनी पाहिले तर वडील त्यांच्यावर चिडायचे. शाळेत चोरून जावे लागत असे. त्यांची आई मात्र त्यांचे भरभरून कौतुक करीत असे. त्यांची आई त्यांना रोज लोककथा ऐकवत असे. त्यांच्या आईचा भोगवटा स्वत: त्यांनी जवळून पाहिला होता. त्यांच्या आईने फार मोठे तत्त्वज्ञान त्यांच्या मनामध्ये पेरून ठेवले होते. त्यांच्या दृष्टीने ही गोष्ट फार मोलाची ठरली होती. आईच्या डोळयातील दु:ख त्यांनी पाहिलं होते. आईने सांगितलेल्या कथा तसेच गायलेली गाणी काळजाचा ठाव घेणारी अशीच होती. या साऱ्या संस्काराचा परिणाम त्यांच्या मनाच्या जडण - घडणीवरही तितकाच झाला होता. अनुवांशिकतेतून आपण लेखक झालो असे सदानंद देशमुख अभिमानाने सांगतात.

ते मोठे झाल्यावरही त्यांचे वाचनाचे वेड काही कमी झाले नव्हते. नांगराची मूठ धरून चालताना आणि कुई - कुई वाजणाऱ्या चाकाच्या गतीनं पुस्तकातील ओळी मनात सतत रूंजी घालत असत.

त्यांचा जन्म ग्रामीण मातीत झाल्याने त्यांची ग्रामीण मातीशी जुळलेली नाळ अतिशय घट्ट झाली आहे असे दिसून येते. सदानंद देशमुख एका मुलाखतीत म्हणतात, "या भूमीवरचे भूमिपुत्र जे जगणं जगतात, ते जन्मापासून मी पहात होतो. आईच्या उदरात असल्यापासून शेतीशी माझा संबंध होता. नंतर जन्माला आल्यावर तिच्या कडेवर बसून मी शेतशिवार निरखली. वावरातल्या आंब्याच्या डांगीला बांधलेल्या झोळण्यातून झाडातल्या पाखरांची गाणी ऐकली. पळणारं आभाळ डोळयांनी फिरत राहिलो. हातपाय चालू लागले, तसा टप्प्याटप्प्यानं गुरं राखणं, औतफाटे चालवणं शिकत गेलो. त्या माध्यमातून सर्जनसोहळयाशी, तो सोहळा साजरा करणाऱ्या भूमीशी बांधलेला राहिलो. त्यातून जे काही मनात झिरपत गेलं, तेच 'पेराल तसं उगवतं' या प्राकृतिक न्यायाने माझ्यातून उगवत गेलं. असं मला माझ्या साहित्यनिर्मितीच्या बाबतीत सांगता येईल."[१] त्यांची ही भावना अगदी हृदयातून प्रगटली आहे असेच म्हणावे लागेल. त्यांनी व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी', भालचंद्र नेमाडेंची 'कोसला', आनंद यादवांची 'गोतावळा', रा. रं. बोराडेची 'पाचोळा' या कादंबऱ्यांचे वाचन केले. त्या कादंबऱ्यातील पात्रे, कथानकांचा चांगला पुरेपूर अभ्यास देशमुखांनी केला. ग्रामीण जीवनाविषयी अधिक ओढ त्यांना लागली होती. या ग्रामीण कादंबऱ्यांनी देशमुखांच्या काळजावर मोहोर उठवली होती. आपणसुध्दा आपल्या सभोवतालचे वातावरण, ग्रामीण जीवन कथा - कादंबऱ्यात शब्दबध्द करू शकतो असा आत्मविश्वास जागृत झाला आणि आपल्या ग्रामीण जीवनातील अनुभवाच्या गाठोडयाची शिदोरी घेऊन त्यांनी ग्रामीण जीवनानुभव साहित्यात चित्रित करण्यास प्रारंभ केला. दहावीपर्यंतच्या काळात त्यांना अनुभवाने बरेच काही शिकायला मिळाले. हळूहळू त्यांचे मन अधिक चिंतनशील आणि चिकित्सक बनत गेले. गावातील भयाण परिस्थिती बघून मन गलबलून यायचे. दारात आलेल्या पारधी समाजातील एखाद्या स्त्रीला पाहिले की तिच्याविषयी कळवळा वाटायचा यांच्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे असे त्यांना सतत वाटायचे. हा विचार त्यांनी साहित्यलेखनाद्वारे प्रकट केला आहे असे म्हणायला हवे.

आणीबाणीच्या काळातील परिस्थिती त्यांनी स्वत: डोळयांनी पाहिली होती. अनुभवली होती. त्या काळातील घडणाऱ्या घटनांमुळे सारा गाव ढवळून निघाला होता. गावातील माणसांची झालेली भयाण परिस्थिती पाहून मन अस्वस्थ होत असे. ही भयानकता प्रत्यक्ष डोळयाने पाहिल्याने देशमुखांची दृष्टी अधिक व्यापक बनली. या माणसांची असणारी ओढ त्यांच्या कथा - कादंबऱ्यातून वेळोवेळी जाणवल्याशिवाय रहात नाही.

शेत - शिवारात फिरताना कथेतील पात्रे प्रत्यक्ष डोळयासमोर उभी राहायला फारसा वेळ लागला नाही. ग्रामीण जीवनातील बसणारे चटके, गरिबी, दारिद्रय या साऱ्यांचा अनुभव स्वत:ला येत होता. या भयाण परिस्थितीत जीवन कंठावे लागत होते. त्यामुळे मनाची सारखी घुसमट व्हायची. ही मनाची घुसमटच त्यांच्या लेखनाची प्रेरणा ठरली. ग्रामीण जीवनाविषयी हृदयी असणारा कळवळा आणि त्याविषयी वाटणारी तळमळ ही त्यांच्या लेखनाची प्रमुख वैशिष्टये ठरली. म्हणूनच त्यांचे आजचे लेखन परिपक्वतेचा पाक ठरत आहे.

प्रा. सदानंद देशमुख यांच्या आई - वडिलांचे एका पाठोपाठ निधन झाले होते, तेव्हा त्यांचे शिक्षण दहावीपर्यंतच झाले होते. सर्व भाऊ उघडे पडले होते. प्रत्येकाने मिळेल त्या दिशेने मार्ग शोधला होता. या काळात त्यांनी खूप काही भोगले होते. पण आपल्या काळया मातीला आणि पुस्तकांना मात्र कधी दूर ठेवले नाही. शेतात राबत राहिले. अनेक पुस्तकांचे वाचन केले कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारल्यावर पुन्हा दोन वर्षांनी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. पण जे भोगलं होतं ते मात्र विसरू शकले नाहीत. आपल्या सभोवतालचे भयानक वास्तव, येथील दु:ख येथे जगणारा माणूस, त्यांच्या समस्या आपण कागदावर मांडू शकतो याची जाणीव अंर्तमनाला झाली आणि ती दु:खे, अस्थिरता, दारिद्रय, गरीब शेतकऱ्यांचे प्रश्न कागदावर मांडण्याचा त्यांच्या मनाने ध्यास घेतला. शब्दांच्या संगतीने सारे ग्रामीण जीवन शब्दबध्द केले.

आई - वडिलांचे कृपाछत्र हरवल्यानंतर त्यांच्या जीवनात आलेली अवकळा, बेकारीत जीवन जगताना त्यांना बसलेले चटके. यामुळे झालेला मनस्ताप आणि वेदना त्यांना सहन कराव्या लागल्या होत्या. एकीकडे शहरी जीवन आणि ग्रामीण जीवन यामधील तफावत जाणवू लागली तर दुसरीकडे शहरी आणि ग्रामीण माणसांची तुलना करताना अन्यायग्रस्तांची असहाय्यता कळून आली आणि एकूणच समाजव्यवस्थेतील चीड आणणाऱ्या ज्या गोष्टी होत्या त्या अधिक समजू लागल्या - उमजू लागल्या. यातूनच ग्रामीण साहित्यलेखन आकारास येऊ लागले. ग्रामीण जीवनाचे लेखन ही एक काळाची गरज आहे असे सदानंद देशमुखांना वाटू लागले होते.

लेखनासाठी ग्रामीण जीवन त्यांना अधिक जवळचे वाटत होते. ग्रामीण जीवनातील वास्तव जीवन, त्यातील दाहकता त्यांना अधिक प्रेरक ठरली. सामाजिक समस्यांना व्यक्तिगत, कौटुंबिक तसेच गावपातळीवरून स्पर्श करता येऊ शकतो याची जाणीव त्यांना झाली होती.

प्रा. सदानंद देशमुख हे स्वत: खेडयात रहात होते. त्यामुळे खेडयातील समग्र जीवनाचा अनुभव प्रत्यक्ष घेतला होता. म्हणूनच त्यांची लेखणी ग्रामीण वास्तव्य मांडण्यात अतिशय यशस्वी ठरली. बदलत्या ग्रामीण जीवनाला ते अधिक धीटपणे सामोरे गेले. ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थिती अधिक दयनीय असल्याने आणि अपुऱ्या संधीमुळे मानसिकदृष्टया सैरवैर झालेल्या मानवी मनाच्या व्यथा - वेदनांना शब्दरूप देण्यासाठी त्यांनी लेखणी हेच सर्वोत्तम अस्त्र वापरले असेच म्हणावे लागेल.

प्रा. सदानंद देशमुखांनी अतिशय डोळसपणे ग्रामीण जीवनाचा वेध घेतलेला दिसून येतो. त्यांचे लेखन समाजपरिवर्तनवादी असे आहे. ग्रामीण जीवनाचा आलेख त्यांनी प्रथमत: आपल्या काही कथासंग्रहातून मांडला. त्यांच्या या कथासंग्रहात बोथटता जाणवत नाही. ग्रामीण जीवनाशी असलेले त्यांचे घनिष्ठ नाते त्यांच्या बोलीभाषेच्या वेळोवेळी केलेल्या वापरावरून समजते. त्यांनी कथा, कादंबऱ्यातून विदर्भातील बोली आणि प्रसंगही तितकेच जिवंतपणे मांडले आहेत. आजही देशमुखांचे वास्तव्य खेडेगावात असल्याने त्यांचे ग्रामीण लेखनही तितकेच प्रभावशाली होत आहे.

ग्रामीण भागातील माणसांना सतत अशा भेडसावणाऱ्या समस्या ह्या एक जीवघेण्या ठरत आहेत. अनेक सामाजिक प्रश्न ग्रामीण माणसासमोर उभे आहेत. काळ जरी बदलत असला तरी ग्रामीण भागातल्या समस्या काही संपल्या नाहीत. २१ व्या शतकातही ग्रामीण माणसासमोर तितक्याच ज्वलंत समस्या उभ्या आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी ग्रामीण भाग हा समस्यांनी ग्रासलेला आहे. ग्रामीण माणूस जगण्यासाठी तळमळताना दिसून येतो. 'पाणीटंचाई' ही एक ग्रामीण भागातील महत्त्वाची समस्या आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे ही समस्या भेडसावत आहेच परंतु या अभागी लोकांना अडचणीत आणून स्वार्थ साधणारे महाभाग काही कमी नाहीत. याचेच वास्तव चित्रण 'तहान' मधून आले आहे.

'तहान' संदर्भात रा.रं. बोराडे म्हणतात, "कादंबरीचे 'तहान' हे शीर्षकही बोलके आहे. ती तहान जितकी पाण्याशी निगडित आहे तितकीच वासनेशी निगडित आहे. क्षणिक भौतिक सुखाशीही निगडित आहे. हे सुख ज्यामुळे मिळू शकते त्या पैशाशीसुध्दा निगडित आहे आणि हीच तहान आज ग्रामीण जीवनाला विनाशाकडे घेऊन जात आहे. तुमच्या 'तहान' कादंबरीने ही धोक्याची रास्त सूचना दिली आहे. ती एकूण समाजव्यवस्थेच्या दृष्टीने मला महत्त्वाची वाटते."[१०]

ग्रामीण व्यवस्थेचा प्रमुख घटक म्हणजे बळीराजा. या बळीराजाच्या दयनीय

अवस्थेचे चित्रण 'बारोमास' मधून आलेले आहे. २१ व्या शतकातही भारतातील शेतकरी हा दुर्लक्षित राहिलेला वर्ग आहे. याची जाणीव देशमुखांनी अत्यंत परखडपणे करून दिली असे वाटल्याशिवाय रहात नाही.

प्रा. सदानंद देशमुख हे ज्या समाजघटकातून पुढे आले त्या ग्रामीण जीवनाशी प्रामाणिक आणि निष्ठा राखून त्यांनी ग्रामीण वास्तव साकार करण्यावर अधिक भर दिला आहे. ग्रामीण माणसांच्या समस्या, त्यांच्या व्यथा - वेदना साहित्यातून मांडून समाजाच्या डोळयात अंजन घालण्याचे अतिशय मोलाचे कार्य प्रा. सदानंद देशमुख हे अविरतपणे करीत आहेत. ग्रामीण जीवनात झालेले परिवर्तन, बदलते खेडे या साऱ्या गोष्टी डोळयासमोर ठेवून त्यांनी लेखन केलेले आहे आणि करीतही आहेत.

निसर्ग, समाज आणि व्यक्ती यांच्यामधील संघर्ष यांचा समतोल राखूनच सदानंद देशमुख यांचे लेखन होत आहे.

प्रा. केशव सखाराम देशमुख यांनी प्रा. सदानंद देशमुख यांची मुलाखत घेतली त्यावेळी त्यांचा 'मातीतून उगवलेला लेखक' असा गौरव केला आहे व पुढे ते असेही म्हणतात, "मातीचा रंग धारण करून खेडी - शेती - माणूस यांचं अंतरंग उकलून दाखवणारं लेखन करून, सदानंद देशमुख यांनी स्वत:ची सर्जनशीलता सिध्द केली. 'बारोमास', 'तहान' या दोन कादंबऱ्या, 'लचांड', 'महालूट', 'उठाव', 'रगडा' हे कथासंग्रह, 'गावकळा' हा कवितासंग्रह तर 'मेळवण' हे ललितगद्याच पुस्तक हे देशमुखांचं ग्रंथरूप लेखन वर्तन, विचार, आणि लेखन या त्रयीमध्ये हा लेखक आपली बावनकशी कृतज्ञता नैतिक विचारानं जपतो सोंग न करता लेखणीतून पाझरणारी देशमुखांची गुणवत्ता त्यांनी त्यांच्या कुठल्याही पुस्तकातून काकणभरही ढळू दिली नाही. कुठल्या टीकेने कधीच नाउमेद न होणारा , आणि प्रसिध्दीने मोहरून न जाणारा, मातीचे पाय असणारा हा लेखक आहे. मानवी भावना, उर्मी, प्रश्न, प्रतिमा, वेदना, श्रम, नातीगोती, स्त्री - पुरूषसंबंध आणि सहवास यांचा जुलूस घेऊन निघालेला हा निर्भीड लेखक मातीला वंदन करणारा लेखक आहे. सत्य आणि स्वाभाविकता हे या लेखकाच्या लेखणीचे मानदंड होत"[११]

चिखलापासून पाणी जसं तुटत नाही तसं ग्रामीण लेखकाच ग्रामीण मातीशी असलेल नातं तुटत नाही हे वरील संदर्भावरून लक्षात येते. ग्रामीण जीवन हा लेखनाचा केंद्रबिंदू मानून साहित्यलेखनातून ग्रामीण जीवनातील विविध स्तरांचा शोध घेऊन निरीक्षण चिंतनातून तळागाळापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न सदानंद देशमुखांनी केलेला दिसून येतो.

वैचारिक समीक्षणात्मक, वाचनातून बऱ्याच गोष्टींचं आकलन झाल्याने त्यांनी आपले लेखन कलात्मक तसेच संस्मरणीय पातळीवर अभिव्यक्त केलेले आहे. ग्रामीण साहित्यदरबारात एक नावलौकिकतेचा मान मिळाला तो त्यांच्या धारदार ग्रामीण लेखणीनेच असे समजायला हरकत नाही.

❖ **'बारोमास' लिहण्यामागील प्रेरणा: -**

जेव्हा एखादी व्यक्ती लेखक म्हणून उदयास येते तेव्हा तिच्या लिखाणामागे काहीतरी प्रेरणा किंवा एखादी घटना असते. लेखक हा समाजातील एक घटक असतो. अवतीभोवतीचा परिसर, तेथील परिस्थिती, अनुभव यातून प्रेरणा घेऊन साहित्यनिर्मिती होत असते. आजूबाजूचा समाज, समाजात घडत असणाऱ्या वेगवेगळया घटना साहित्यात येत असतात. समाजातील घटनांकडे पाहून तो अस्वस्थ होत असतो. या अस्वस्थतेतून मनाला बसलेल्या वेदनांच्या चटक्यातून साहित्यनिर्मिती होत असते. समाजातील एक घटक या नात्याने, समाजाची बांधिलकी म्हणून लेखक आपल्या लेखणीतून समाजातील घटना टिपत असतो.

प्रा. सदानंद देशमुख यांच्या बाबतीतही अशाच घटना, प्रसंग घडले आणि एक ग्रामीण लेखक म्हणून ते नावारूपास आले. 'बारोमास' निर्मिती म्हणजे लेखकाचे दहा - बारा वर्षाचं चिंतन होतं अस ते स्वत: म्हणतात. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या प्रा. सदानंद देशमुख यांनी कास्तकार कुटुंबातील वर्षानुवर्षे चालणाऱ्या विवंचना, त्यांची मानसिकता, सुशिक्षित बेरोजगार तरूणांची परवड, श्रीमंताचा हव्यास, चंगळवाद, निसर्गाची अवकृपा, व्यापारी - सावकार यांच्याकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक या साऱ्या गोष्टींचा समीक्षणात्मक अभ्यास करून 'बारोमास' ही कादंबरी साकारली आहे. ग्रामीण माणसांच्या मनाचा तळ, हृदयाचा ठाव, उदासिनता याचा शोध घेऊन समाजाला एक बोध दिला आहे. स्वत:ला आलेल्या ग्रामीण जीवनानुभवांनी मन अधिक चिंतनशील बनले होते. या चिंतनाला अक्षरांनी साद घालून 'बारोमास' या कादंबरीला प्रत्यक्ष रूप प्राप्त करून दिले.

प्रा. सदानंद देशमुख यांचे वास्तव्य बराच काळ खेडयात होते. त्यामुळे तेथील ग्रामीण समाज जीवन, कृषिसंस्कृतीची पडझड जवळून पाहिली होती. ग्रामीण समाजातील समस्या डोळयांप्रमाणेच मनही उघडे ठेवून उत्तरे शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

'बारोमास' या कादंबरी प्रेरणेविषयी खुद्द प्रा. सदानंद देशमुख यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे, ती अशा शब्दात - "माझ्या सभोवतालचा

ओला - सुका ग्रामीण परिसर हेच तिचे प्रेरणास्थान आहे. लेखकाने आपल्या निष्ठा आणि अनुभव यांच्याशी प्रामाणिक राहून लेखन करण्याच्या माझ्यावरच्या संस्कारातूनच ही कादंबरी आकाराला आली आहे. अमडापूर हे गावच या कादंबरीचा नायक आहे. अभावग्रस्त परिस्थितीमुळे झडून गेलेली माणसं, संकटाच्या दाढेत सापडलेली शेती, जमिनीचे तुकडीकरण, जुनी आणि नवी पिढी यांच्यातील वित्तीय आणि भावनिक तणाव, परंपरा आणि नव्या आशा यांच्यातील संघर्ष, संस्कारी मन आणि शिक्षित मन यांच्यातील सांस्कृतिक, भावनिक व कौटुंबिक कलह, असे सगळे घटक 'बारोमास' मधून स्पष्ट होतात."[१२] या त्यांच्या भावनांवरून असे म्हणता येईल की, ग्रामीण जीवन हे त्यांच्या नसानसात भिनले आहे.

अपुऱ्या अर्थाजनामुळे हवालदिल झालेला शेतकरी व त्यांच्या मुलांची झालेली परवड, शिक्षणाचे बाजारीकरण, शेती व्यवसायाविषयी वाटणारी घृणा, सुशिक्षित परंतु बेकार असणाऱ्या तरूणांच्या व्यथा - वेदना या साऱ्यांचा आलेख सदानंद देशमुखांना समाजासमोर मांडावयाचा होता. याच प्रेरणेतून 'बारोमास' ची निर्मिती झाली. " 'बारोमास' कादंबरीचा कालावधी बारा महिन्यातील असला तरी त्यामागचं चिंतन मागच्या बारा वर्षाचं होतं"[१३] असे स्वत: देशमुखांनी एका मुलाखतीत सांगितले आहे.

शेतकरी हा सर्वांचा अन्नदाता आहे आणि तोच आज उपाशी आहे. आजही शेतकरी हा दुर्लक्षित राहिलेला घटक आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी दु:खी तर आहेच परंतु सावकारी पाश यामुळे त्याची अधिकच कोंडी झाली आहे. शेतकऱ्याचे जीवन हे निसर्गावर अवलंबून आहे. त्यांचप्रमाणे ते सामाजिक परिस्थितीवरही अवलंबून आहे. शेतकरी हा दारिद्र्यात खितपत पडलेला दिसून येतो. शेतीत फायद्यापेक्षा नुकसान अधिक होत आहे आणि या साऱ्या घटनांना कंटाळून शेतकरी आत्महत्या करतो आणि हा प्रश्न अधिकच बिकट होतो. यासाठी काही उपाय योजना केल्या पाहिजेत हा हेतू मनात ठेवूनच 'बारोमास' ची निर्मिती असावी असे म्हणावे लागेल.

जो शेतकरी रात्रंदिवस शेतावर प्रत्यक्षपणे राबत असतो. ज्याचं मन मातीशी समरस झालेलं असत अशा या निष्ठावंत शेतकऱ्याला वरपासून खालपर्यंत राजरोसपणे लुबाडले जात असतं. शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात शासकीय कर्मचाऱ्यांचा वाटा असतो. यामुळे शेतकरी हे अनुदान नाकारतो कारण मिळणाऱ्या अनुदानापैकी एकच वाटा त्याच्या हातात पडणार असतो व चार भाग मदत करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याच्या खिशात जाणार असतात. हे कटू सत्य आहे.

आपला भारत देश हा कृषिप्रधान देश आहे. सुमारे ७०% समाज हा

खेडयात वास्तव्य करीत आहे. ग्रामव्यवस्थेतील प्रमुख घटक शेतकरी हा आहे. देशाला स्वातंत्र मिळून पन्नास वर्षे उलटून गेली तरीही शेतकऱ्याचे जीवन सुखी झाले नाही. शेतकरी हा तसाच दारिद्रयाच्या दलदलीत रूतून बसला आहे. याला कारणीभूत असणाऱ्या अनेक घटकांचा अभ्यास देशमुखांनी केला आहे.

भारताची रोगट कृषिव्यवस्था, आस्मानी आणि सुलतानी गर्तेत शेतकरी सापडत आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात रयतवारी, महालवारी, कायमधारा अशा प्रत्येक पर्यायी करपध्दतीमुळे शेतकरी कर्जबाजारी होत असे. आजची परिस्थितीही फारसी बदललेली नाही असेच म्हणावे लागेल. शेतकरी हा दिवसेंदिवस कर्जाच्या ओझ्याखाली दबला गेला आहे. या कर्जापायी तो वर निघू शकत नाही. कायम त्याच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर बसलेला असतो. शेतकरी वर्ग तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करीत जीवन व्यतीत करीत असतो. शेतकऱ्यासाठी योजलेल्या ग्रामविकास योजना ह्या दिलासा देणाऱ्या असल्या तरी नोकरशाही आणि व्यापारीवर्ग यांच्या तुलनेत शेतकऱ्यांचा दर्जा कनिष्ठ झाला आहे. तो कितीतरी मागासलेला आहे. शेतकऱ्यांना आपल्या शेतीव्यवसायाबद्दल मनात अनास्था वाटत आहे. या रोगट कृषिव्यवस्थेवर वरवरचे डोस पाजून उपचार केले तरीही बरा न होणारा हा रोग आहे. त्यावर योग्य ती शस्त्रक्रिया हाच एक योग्य उपाय ठरेल.

वेगाने होणारे जागतिकीकरण व्यापारीवर्गाच्या भांडवलशाहीला आजचा शेतकरी सामोरा जात आहे. आधीच पेरले तर पिकत नाही आणि पिकले तर विकत नाही अशी गत आजच्या शेतमालाची होत आहे. शेतमालाच्या निर्यातीवर अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात काही छोटे - मोठे उद्योगधंदे, कारखाने यांची निर्मिती करून प्रत्येक शेतकरी कुटुंबातील एखादी व्यक्ती तरी मासिक वेतन मिळवून जबाबदारी सांभाळेल अन्यथा शेतकऱ्यांच्या मुलांच्या बेकारीचा प्रश्न अधिकच बिकट होईल. आजचा तरूण दिशाहीन भरकटला जातोय. शहरातील भौतिक सुख - सुविधांचे आजच्या तरूण पिढीला आकर्षण वाटू लागले आहे. शहरी जीवनाचे चित्र पाहून त्याच्या मनात स्वत:च्या परिसराचा आणि स्वत: विषयी जगण्याचा न्यूनगंड निर्माण होताना दिसतो आहे. इतकी भयानक परिस्थिती समाजामध्ये निर्माण झाली आहे. समाजातील तरूण पिढी, शेतकऱ्यांची दयनीयता, विवशता, ग्रामीण स्त्रीच्या काळजाला भिडणाऱ्या व्यथा - वेदना हे प्रत्यक्ष अनुभवास येत होते. त्याच प्रमाणे राजकीय निर्णय आणि आस्मानी संकटासमोर हतबल झालेला दरिद्री शेतकरी हे सारे भयानक वास्तव आपल्या डोळयासमोर उभे राहत होते.

गरीब शेतकरी शेतीसाठी बँकाकडून, संस्थाकडून, वा सावकाराकडून

कर्ज काढतो. शेतीत भांडवल घालतो परंतु निसर्गाच्या लहरीपणामुळे त्याच्या भांडवलाइतके उत्पादनही निघत नाही. कर्जबाजारीपणा वाढतच जातो आणि या शेतकऱ्यापुढे एकच पर्याय उरतो तो म्हणजे आत्महत्या.

आत्महत्या करणे म्हणजे भ्याडपणा असे तत्त्वज्ञान मांडणे सोपे असले तरी आत्मगौरव हरवलेला भूमीपुत्र काही अचानकपणे आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत नसतो. कर्जबाजारी झालेल्या व अवकळा आलेल्या पुढील भविष्याच्या दृष्टीने भयभीत झालेल्या शेतकऱ्याच्या आत्म्याची हत्या या समाजाकडून होत असते. या साऱ्या गोष्टी असह्य झाल्यावर तो दृश्यस्वरूपात देहाची हत्या करीत असतो. हे कटू सत्य आपल्या मनात घर करून राहिले होते. अशी भूमिका प्रा. सदानंद देशमुखांनी 'बारोमास' च्या निर्मितीविषयी मांडली आहे.

भारतीय कृषिव्यवस्थेतील फोलपणा आणि शेतकरी जीवनाची होणारी शोकांतिका याचे चित्र सदैव डोळयासमोर उभे रहात होते. त्याला अक्षरबध्द करून समाजाला त्याची जाणीव करून द्यायची होती. खडतर जीवनानुभव मांडण्यासाठी त्यांच्या मनाने ध्यास घेतला होता. 'बारोमास' लिहिण्याआधी त्यांच्या मनात अनेक विचारांची रूंजी सुरू होती. अस्वस्थतेचे काहूर उठले होते. 'बारोमास' निर्मितीपूर्वी त्यांच्या मनातील भावना उचंबळून येत होत्या. या भावनांविषयी प्रा. सदानंद देशमुख स्वत: म्हणतात, "मी स्वत: शेती केली असल्यामुळे शेतीतील अस्मानी - सुलतानी अनुभव काळजातून घेत असल्यामुळे हे सारं विस्तारानं आलं पाहिजे असं सारखं वाटत रहायचं आणि सगळे धागे जवळ यायचे. एकांताच्या पारावर ह्या आशयसूत्राच्या हाका असह्य होत होत्या आणि निश्चित असे कथानक, पात्र, प्रसंग, संवाद असे भोवतालातून आपले आपण तयार होत होते. तसे मी ते होऊ देत होतो. अशा त्या आकाराला वाढू देताना आल्हाद, आस्वाद, अस्वस्थता अनुभवताना मग व्यवस्थित सिध्द होऊन निश्चित अशी वैचारिक बैठक घेऊन मनातल्या भावनेला आभाळपाखरांने भुईवर उतरावे, तसे कागदावर उतरू दिले. पण हे करताना पुन: पुन्हा स्वत:ला सावरून धरले. कारण मला केवळ भावकथा नको होती. एका कलात्मक मांडणी सोबतच, वर्तमान ग्रामीण समाजव्यवस्था, वास्तवदर्शी जीवनदर्शन, बदलती मूल्ये ह्या सर्व बाबीचा समतोल साधायचा होता"[१४] या त्यांच्या भूमिकेवरून त्यांच्या लिखानामागची तळमळ आणि कळकळ दिसून येते.

प्रा. सदानंद देशमुख यांनी ग्रामीण जीवनातील सामाजिक समस्यांना अग्रस्थानी ठेवून आपले साहित्य निर्माण केले आहे. 'बारोमास' ही कादंबरी निर्माण करण्यापूर्वी त्यांनी खेडयापाडयातील शेतकरी कुटुंबाचा, मिश्र अर्थव्यवस्थेचा,

जागतिकीकरणाचा होणारा परिणाम याचा सखोल अभ्यास केला एवढे मात्र खरे. भारतीय कृषिव्यवस्थेचे अस्सल वास्तव चित्रित करून समाजाच्या डोळयात झणझणीत अंजन घातले आहे. आजूबाजूच्या ग्रामीण व शहरी जीवनाचे भान वाचकांना आणून दिले आहे. शहरी आणि ग्रामीण माणसांची तुलना करून त्यांची मानसिकता टिपण्याचा प्रयत्न केला आहे. 'बारोमास' लिहिण्यामागची त्यांची भूमिका आणि प्रेरणा मनाचा ठाव घेणारी अशी आहे.

'बारोमास' ही कादंबरी सामाजिक प्रश्न हाताळणारी एक दस्तऐवज ठरली आहे. त्यांनी ग्रामीण भागाचा वसा आणि वारसा घेऊनच या कादंबरीचे लेखन केले आहे असे आपण निर्विवादपणे आपण म्हणू शकतो.

विदर्भातील ग्रामीण शेतकऱ्यांच्या जीवनातील भयानक जीवनाचे वास्तव प्रतिबिंब आपल्या साहित्यकृतीतून उमटविले आहे. शेतकऱ्यांचे अस्तित्व, जीवनसंघर्ष यांचे चित्रण करण्याचा त्यांचा मानस सफल झाला असे म्हणणे उचित ठरेल. बदलत्या समाजपरिवर्तनाला सामोरे जाणारी कादंबरी म्हणून 'बारोमास' कडे पाहता येईल. धगधगत्या ग्रामीण जीवनातील दाहकता आणि शेतकऱ्यांची विवशता बारोमासमधून प्रकट झाली यात शंकाच नाही.

सारांश, वरील सर्व विवेचनावरून असे म्हणता येईल की, 'बारोमास' आणि इतर साहित्य लेखनामागची प्रेरणा ही ग्रामीण मातीतूनच सदानंद देशमुखांना मिळाली आहे. आपल्या काळया आईशी इमान राखूनच आपली लेखणी प्रकाशमान केली आहे. ग्रामीण जीवन  परिवर्तनाचा वेध घेण्यात लेखक कमालीचा यशस्वी झालेला दिसून येतो.

'बारोमास म्हणजे नुसती कडकड आणि रडरड' या वाक्यातच कादंबरीचे यश सामावलेले दिसते. 'बारोमास' ने ग्रामीण कादंबरीचा प्रवास उच्चतम पातळीवर पोहचवून मराठी ग्रामीण साहित्याचे दालन कमालीचे समृध्द केले आहे. 'बारोमास' ही कलाकृती वाचताना प्रा. सदानंद देशमुखांनी दिलेले शीर्षक अगदी सार्थ वाटते.

प्रा. सदानंद देशमुख यांचे साहित्यलेखन आजही सुरू आहे. त्यांनी आपली साहित्य लेखणी ग्रामीणविश्वाला समर्पित केली आहे. ग्रामीण साहित्यविश्वात सदानंद देशमुख मोलाचे योगदान देत आहेत. त्यांचे साहित्य बहरलेले आहे. यावरून ग्रामीण वाङ्मयक्षेत्रातील त्यांचे मोलाचे स्थान दिसून येते. ग्रामीण साहित्यातील नव्या दमाचे आधुनिक ग्रामीण लेखक म्हणून त्यांचा केलेला उल्लेख अगदी यथार्थ वाटतो.

प्रस्तुत प्रकरणात आपण प्रा. सदानंद देशमुख यांचे व्यक्तिचरित्र, ग्रामीण

जीवनाशी त्यांची जुळलेली नाळ, आणि बारोमास लिहिण्यामागील प्रेरणा या घटकांच्या आधारे त्यांच्या वाङ्मयीन कार्याचा अभ्यास मांडला आहे. ग्रामीण साहित्याच्या अवकाशात एक नवा तारा सदानंद देशमुखांच्या रूपाने चमचमताना दिसतो आहे असे म्हटले तरी वावगे ठरू नये.

## संदर्भ

१. अंतर्नाद, दिवाळी अंक २००७, संपादक - काळे भानू , 'मातीतून उगवलेला लेखक', सदानंद देशमुख यांची केशव सखाराम देशमुख यांनी घेतलेली मुलाखत, पृ. ७५.

२. तहान: स्वरूप आणि समीक्षा, संपादक - नार्वेकर कैलास, अभिप्राय - र. बा. मंचरकर (पत्रातून), प्रथम आवृत्ती २००३, पृ. १४९.

३. साहित्य अकादेमी पुरस्कार, दिल्ली. (२००४) बारोमास, पृ. ३५२ वरून उध्दृत.

४. महाराष्ट्र साहित्यपत्रिका क्र. ३१५, ऑक्टोंबर - नोव्हेंबर - डिसेंबर २००५, संपादक - डॉ. कुलकर्णी सु. प्र., लेख - प्रा. मेधा काळे 'आजच्या ग्रामीण जीवनाचे वास्तवचित्रण 'बारोमास' ' , पृ. ३०.

५. लोकसत्ता, पुणे, शुक्रवार, २४ डिसेंबर २००४, पृ. ७.

६. लचांड, प्रस्तावना - मुलाटे वासुदेव.

७. लोकसत्ता - वृत्तवेध, उनि.

८. लोकसत्ता, उनि. पृ. ६.

९. अंतर्नाद, उनि. पृ. ७४.

१०. संपादक - नार्वेकर कैलास, उनि. अभिप्राय - प्रा. रा. रं. बोराडे (पत्रातून), पृ. १४९.

११. अंतर्नाद, उनि. पृ. ७३.

१२. तत्रैव, पृ. ७६.

१३. तत्रैव, पृ. ७९.

१४. महाराष्ट्र साहित्यपत्रिका क्र. ३०१, एप्रिल - मे - जून २००२, संपादक - कुलकर्णी अरविंद वामन, लेख - प्रा. सदानंद देशमुख, 'भोवतालच्या परिसरातून लेखनाची प्रेरणा मिळते', पृ. ७६.

**********